# गोवा पोलिस हॅकाथॉन स्पर्धेत बिटस्‌चा 'बिटस्‌एनपिसेस' विद्यार्थी संघ विजेता

प्रतिनिधी
वास्को

दि. १० व ११ रोजी पार पडलेल्या पहिल्या गोवा पोलीस हॅकाथॉन स्पर्धेत बिटस्‌ पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसच्या 'बिटस्‌एनपिसेस' संघाने प्रथम पारितोषिक पटकावले. गोव्यातील प्रमुख शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने गोवा पोलिसांचा हा पहिलाच उपक्रम होता. सायबर सुरक्षा संबंधित विषयावरील 'बिटस्‌एनपिसेस' संघाला २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक, चषक व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

सुमारे २०० विद्यार्थी आणि अर्ज केलेल्या ४३ संघापैकी सुमारे २० संघांना ४८ तासांच्या नॉनस्टॉप हॅकाथॉनसाठी निवडण्यात आले होते. बिटस्‌ पिलानी गोवा कॅम्पसमधील बिटस्‌एन पिसेस, बिटस्‌ ॲण्ड्रोमलडिटेक्ट व मालवारेबस्टर्झ या तीन संघाची हॅकाथॉनमध्ये निवड झाली होती.

बिटस्‌ पिलानीच्या 'बिटसएनपिसेस' विजेत्या संघात प्रणित बाला, भारत हेगडे व अखिल बन्सल यांचा समावेश होता. विजेत्या संघाला गोव्याचे मुख्य सचिव पुनीत कुमार गोयल (आयएएस) यांच्याहस्ते बक्षीस प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी एरोनॉटिकल सिस्टमच्या महासंचालक मिसाईल वुमन डॉ. टेसी थॉमस, पोलीस महासंचालक जसपाल सिंग (आयपीएस), आयआयटी गोवाचे संचालक प्रा. बी. के. मिश्रा व जीईसीचे प्राचार्य डॉ. राजेश लोहानी उपस्थित होते.



फर्मागुडी-फोंडा : गोवा पोलीस हॅकाथॉन स्पर्धेतील विजेता बिटस्‌ पिलानी गोवा कॅम्पसचा विजेता संघ.